**भारतीय जनता पार्टी**

मुंबई ४ मे, २०११

# <u>घोटाळा आदर्श २</u>

## महाराष्ट्र सरकारने बिल्डरला सेनादलाची जागा दान दिलीः डॉ. किरीट सोमय्या

महाराष्ट्र सरकारने कांदिवली, मुंबई येथील मूल्यवान आणि महत्त्वाची अशी संरक्षण दलाची जागा कल्पतरु बिल्डर्सला दान दिली आहे हे आता निश्चीत झाले आहे. हा आणखी एक आदर्श घोटाळा आहे असा आरोप भाजपाचे राष्ट्रीय सचिव डॉ. किरीट सोमय्या यांनी केला आहे. डॉ. सोमय्या यांनी महाराष्ट्र सरकार आणि संरक्षण दलाकडून आरटीआयमार्फत माहिती आणि कागदपत्रे प्राप्त केली आहेत ज्यात स्पष्टपणे म्हटले आहे कि तथाकथित गाव आकुर्ली, कांदिवली, मुंबई येथील सर्व्हे क्र. १३५ आणि १३६ या जमिनीचा भूखंड १९४२ पासून सेनादलाकडे आहे. २००७ मध्ये महाराष्ट्र सरकारच्या महसूल विभागाने संरक्षण मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी हरकत घेऊनही तो भूखंड कल्पतरु बिल्डर्सला दिला.

डॉ. सोमय्या यांनी संपूर्ण घटनेच्या सीबीआय चौकशीची मागणी केली आहे. आता संरक्षण दलाच्या या जमिनीवर नऊ मजली टॉवर उभा राहिला आहे. भाजपा या विषयावर लोकायुक्तांकडे दाद मागण्याचाही विचार करत आहे. आदर्श एक आणि आदर्श दोन घोटाळ्यात अनेक गोष्टी सारख्या आहेत. संरक्षण दलाची जमीन काढून घेऊन बिल्डरला देणे आणि त्या ठिकाणी अनेक मजली टॉवर उभारणे. महाराष्ट्र सरकार आणि बिल्डर्सच्या हातमिळवणीचा घोटाळा. फरक एवढाच आहे कि आदर्श एक मध्ये महसूल मंत्री अशोक चव्हाण होते तर आदर्श २ मध्ये त्यांच्या जागी नारायण राणे आहेत.

भाजपा नेता डॉ. किरीट सोमय्या यांनी आज २०० पानांची कागदपत्रे, पुरावे, आराखडे, सरकारी आदेश, सरकार, संरक्षण, महसूल मंत्रालय, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी, नगर सर्वेक्षण विभाग, कल्पतरु बिल्डर्स, बीएमसी आणि इत्रांच्या दरम्यानचा पत्रव्यवहार सादर केले.

संरक्षण विभागाच्या मुख्यालयाने त्यांच्या पत्र क्र. ४०३५०१/किरीट सोमय्या ऑफ २१ मार्च २०११ अन्वये कळविले आहे कि,

’मुंबई उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी २६ झून २००७ रोजी संरक्षण मंत्रालयाला संदर्भित न करता संरक्षण विभागाची सीटीएस क्र. १३५ आणि १३६ (क्षेत्र ५१६५ चौ.मी.-५५००० चौ.फू.) वरील जमीन निओ फार्मा प्रा. लि. (कल्पतरु समूह कंपनी) यांना विकली. कर्नल सिंग यांनी डॉ. किरीट सोमय्यांना असेही कळविले आहे कि संरक्षण विभागाच्या मालमत्ता अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या जमिनीच्या नोंदी जिल्हाधिकाऱ्यानी मान्य केल्या नाहीत.’

भाजपा नेता डॉ. किरीट सोमय्या यांनी सुद्धा, २२ फेब्रु. १९५३ पासूनच्या जमिनीच्या नोंदी कागदपत्रे सादर केली, जी स्पष्टपणे दाखवितात कि सदर जमीन संरक्षण विभागाची आहे आणि ती त्यांच्या ताब्यात आहे. हे आश्चर्याची गोष्ट म्हणजे सर्व कागदपत्रे महसूल मंत्रालय आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या फाइलमध्ये सुद्धा आहेत.

हा काँग्रेस सरकारचा आणखी एक जमीन घोटाळा आहे, ज्याची सीबीआयकडून चौकशी करण्याची मागणी भाजपाने केली आहे.

(प्रसिद्धी सचिव)